# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०२.०६.२०२०**

## जिल्हा : सातारा

| मागील आठवड्यातील हवामान (२७.०५.२०२० ते ०२.०६.२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०३.०६.२०२० ते ०७.०६.२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ | दिनांक | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | - | पाऊस (मिमी) | ७९ | २० | ३ | ३ | ३ |
| ३८.८ | ३६.७ | ३६.८ | ३६.९ | ३७.८ | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३२ | २८ | २९ | ३० | ३० |
| २४.३ | २२.८ | २३.१ | २४.३ | २५.८ | - | - | किमान तापमान (अं.से.) | २० | २१ | २२ | २२ | २२ |
| २ | १ | ३ | ३ | ५ | - | - | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ७ | ४ | २ |
| ५९ | ६१ | ७० | ६३ | ६४ | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९० | ८९ | ८७ | ८४ | ८४ |
| ४४ | ३३ | ५० | ४८ | ३८ | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ८१ | ५६ | ५२ | ४९ |
| ३.७ | ३.७ | ३.७ | ३.७ | ०.० | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४२ | १८ | १४ | १६ | १७ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | द. | प.नै | प.नै | प.नै | प.नै |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश/ इशारा** | | भारतीय हवामानशास्त्र विभाग पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या अरबी समुद्रामध्ये निर्माण झालेल्या चक्री वादळामुळे सातारा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी दिनांक ०३ जून रोजी मुसळधार, ०४ जून रोजी मध्यम तर दिनांक ५ ते ७ जून दरम्यान हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान २८.० ते ३२.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २०.० ते २२.० अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी १८ ते ४२ कि.मी. दरम्यान राहील. |
| **खरिप पिक नियोजन** | | ➢ खरीप हंगामामध्ये पिक घेण्यासाठी विद्यापीठ विक्री केंद्र किंवा शासन मान्यता प्राप्त विक्री केंद्र यांकडून बियाणे खरेदी करावे.<br>➢ शेतातील मातीमधील अन्नद्रव्याचे प्रमाण, जमिनीचा आम्ल विम्ल निर्देशांक (सामू) तपासून घेण्यासाठी शेतामधील मातीचे नमुने योग्य पद्धतीने गोळा करून जवळच्या शासन मान्य माती परीक्षण प्रयोगशाळेमधून तपासून घ्यावेत. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतीमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.<br>**कोरोना व्हायरस (कोविड-१९) या संसर्गजन्य रोगापासून संरक्षण व संसर्गापासून बचाव करण्यासाठी सल्ला**<br>➢ शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठा खरेदी करणेसाठी मार्केट मध्ये जातेवेळी शेतकरी बांधवांनी सामाजिक अंतर पाळावे तसेच तोंडाला मास्क किंवा स्वच्छ रुमाल बांधावा. वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणारे रसायन किंवा साबण यांनी हात स्वच्छ धुवावेत.<br>➢ शेतामध्ये काम करत असताना शेतमजुरांनी विळा, खुरपी इ. शेती उपयोगी साहित्यांची देवाणघेवाण करू नये किंवा साहित्यांची देवाणघेवाण करावयाची झाल्यास योग्य निर्जंतुक करून देवाणघेवाण करावी. |
| **संदेश** | | ➢ अरबी समुद्रामध्ये निर्माण झालेल्या चक्री वादळामुळे सातारा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी दिनांक ०३ जून रोजी मुसळधार, ०४ जून रोजी मध्यम तर दिनांक ५ ते ७ जून दरम्यान हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>➢ वाऱ्याचा वेग ताशी ४२ किमी पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. |
| **भात** | रोपवाटिका | ➢ खरीप हंगामासाठी रोपवाटिका तयार करण्यासाठी १५ जून पर्यंत गादी वाफ्यावर पेरणी करावी. पेरणीसाठी १ मी. रुंद १५ सें.मी. उंचीचे आणि आवश्यकतेनुसार लांबीचे गादीवाफे तयार करावेत. १ हेक्टर भात लागवडीसाठी १० गुंठे क्षेत्रावरील रोपवाटिका पुरेशी होते. वाफे तयार करताना १ गुंठा क्षेत्रास २५० किलो शेणखत आणि १ किलो युरिया खत मातीमध्ये चांगल्या प्रकारे मिसळावे.<br>खरीप हंगामामध्ये पेरणीसाठी खलील वाणांची उपलब्धता करून घ्यावी.<br>➢ हळवा: कर्जत१८४, रत्नागिरी -१,कर्जत-४, फुले राधा |

| | | |
|---|---|---|
| | | ➢ निमगरवा: फुले समृद्धी<br>➢ गरवा: रत्नागिरी -२ कर्जत-२<br>➢ सुवासिक वाण: बासमती-३७०, इंद्रायणी, भोगावती, सुगंधा<br>➢ संकरीत : सह्याद्री -१, सह्याद्री -४, सह्याद्री -५ |
| **नाचणी** | पेरणीपूर्व तयारी | खरीप हंगामामध्ये पेरणीसाठी खालील वाणांची उपलब्धता करून घ्यावी.<br>➢ निमगरवा:दापोली-१,दापोली-सफेद,फुले कासारी<br>➢ गरवा: फुले नाचणी |
| **राजमा** | पेरणी | खरीप हंगामामध्ये पेरणीसाठी खालील वाणांची उपलब्धता करून घ्यावी.<br>➢ मुठा, वरूण व फुले राजमा |
| **ऊस** | वाढीची | ➢ **हुमणी :** वळवाचा पहिला पाऊस झाल्यावर हुमणीचे भुंगेरे सायंकाळी बाभूळ, कडूनिंब, व बोर या झाडांवर जमा होतात. आगोदर मादी भुंगेरे व त्यानंतर नर भुंगेरे जमिनीतून बाहेर पडतात. या झाडांवर बसून ते झाडांचा पाला खातात. अश्या झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करून रॉकेल मिश्रित पाण्यात टाकूण त्यांचा नाश करावा.<br>➢ हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्यांचा वापर करावा.<br>**पिक संरक्षण**<br>➢ **खोड किडी :** उसामध्ये खोड किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास एकरी दोन फुले ट्रायकोकार्ड १० ते १५ दिवसांच्या अंतराने आवश्यकतेनुसार २ ते ३ वेळा वापरावीत. |
| **भाजीपाला** | रोपवाटिका तयार करणे | कांदा, वांगी, मिरची, टोमॅटो, ई. पिकांची लागवड खरिफ हंगामामध्ये करण्यासाठी गादी वाफ्यावर रोपे तयार करावीत. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ जनावरांना लाळखुरकत, फऱ्या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात.<br>➢ शेळ्यांना गोचीड व पिसवा यांपासून त्रास होऊ नये म्हणून डेल्टामेथ्रीन हे रसायन असलेले (उदा. ब्युटॉक्स) द्रावण पशुवैद्यकाच्या सल्ल्याने गोठ्यात व शेळ्यांच्या अंगावर फवारावे.<br>➢ जनावरे सावलीमध्ये बांधावीत. जनावरांना शुद्ध, स्वच्छ आणि थंड पाणी पिण्यास द्यावे. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. : ०२.०६.२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**